जा. क्र. मु. अ/औ. मं/डिबो/मं. १०४ वी बै/7746
मुख्याधिकारी यांचे कार्यालय,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. दिनांक ३१/१२/९७

प्रति,
कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ.
मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ
मिळकत व्यवस्थापक औरंगाबादमंडळ.
✓ सहाय्यक वास्तुतंज्ञ औरंगाबाद मंडळ.
विधी सहाय्यक औरंगाबाद मंडळ.
भूसंपादन शाखा औरंगाबाद मंडळ.

विषय:- मंडळाच्या दि. ३०.१२.९७ रोजी झालेल्या १०६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दि. ३०.१२.९७ रोजी झालेल्या १०६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत या पत्रासोबत पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यांत येत आहे. सदर कार्यवृत्तांतावर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

(signature)

मुख्य अधिकारी,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
औरंगाबाद.

प्रत आस्थापना शाखा औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दि. ३०.१२.९७ रोजी झालेल्या १०६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. किशनचंदजी तनवाणी | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २. | श्री. एच. के. जावळे मुख्य अधिकारी/औ.मं. | सदस्य औ.मं. |
| ३. | श्री. आय. टी. गायकवाड शहर अभियंता मनपा आयुक्त मनपा यांचे प्रतिनिधी | सदस्य प्रतिनिधी. |
| ४. | श्री. मुददस्सीर सहाय्यक नगररचनाकार उपसंचालक नगररचना यांचे प्रतिनिधी | सदस्य प्रतिनिधी. |
| ५. | श्री. नंदु कुलकर्णी | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ६. | श्री. सुजितसिंह ठाकुर | -"- |
| ७. | श्री. पुंडलीकराव शिंदे | -"- |
| ८. | श्री. गणेश माहेरे | -"- |
| ९. | श्री. सुरेश जैन | -"- |
| १०. | श्री. अशोक लोमटे | -"- |
| ११. | श्री. नारायण जाधव | -"- |
| १२. | श्री. अनिल पोलकर | -"- |
| १३. | श्री. सुरेंद्र कुलकर्णी | -"- |
| १४) | श्रीमती कमल-तुल्ले | सदस्या औरंगाबाद मंडळ |
| १५) | श्रीमती उषा साने | -"- |

वंदे मातरम या राष्ट्रीय गितानंतर, मंडळाचे सदस्य प्रा. नंदु कुलकर्णी यांनी नांदेड येथील शिवचरित्र लिहीणारे इतिहासकार व मराठवाड्याचे थोर सुपुत्र श्री. साईप्रकाश अंबेकर यांचे दि. २८.१२.९७ रोजी मुंबई येथे हृदयविकाराने दुःखद निधन झाल्याबद्दल त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठीचा शोक प्रस्ताव मांडला त्यास सदस्य श्री. ठाकुर यांनी अनुमोदन दिले. सभापती यांच्या मान्यतेनुसार कै. अंबेकर यांना मंडळातर्फे दोन मिनीटाचे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

बैठकीत सुरुवातीला मा. मुख्याधिकारी औ. मं. यांनी मंडळाच्या १०६ व्या बैठकीत मा. सभापती व इतर सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. सभापती औ. मं. यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. तत्पुर्वी मा. मु. अ/औ. मं यांनी मा. सभापती यांना सांगितले की, मंडळाचे सदस्य श्री. तळेकर यांनी दुरध्वनीवरुन कळविले की, ते बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत त्याची मंडळाने नोंद घेतली.

बैठकीत सुरुवातीला दि. २०.८.९७ रोजी झालेल्या मंडळाच्या १०५ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर/ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवालही मंडळास सादर करण्यात आला. -

मंडळाच्या १०५ व्या बैठकीतीलठराव क्र. ६३१ वर केलेल्या कार्यवाहीची माहिती देतांना मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, गृहनिर्माण भवनाजवळील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेतील १६ गाळ्यापैकीउर्वरीत ५ गाळ्यांचे वाटप हे सुरुवातीला निश्चीत केलेली अंदाजीत किंमत घेऊन म्हणजे रु.३,४५,५००/- रक्कम एक रक्कमी घेऊन रिक्त गाळ्यांचे वाटप करण्यात यावे व व्याजाचे भांडवलीकरण केल्यामुळे वाढलेल्या किंमतीची फरकाची रक्कम आठ समान त्रैमासिक हप्त्यात व्याजासह दोन वर्षाच्या कालावधीमध्ये वसूल करण्याच्या अटीवर दि. ६.१०.९७ रोजी स्थानिकवृत्तपत्रातुन जाहिरात देण्यात

आली, असे मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले. यावर मंडळाचे मा. सदस्य श्री. ठाकुर यांनी विचारणा केली की, मंडळाच्या जाहिरातीनुसार लोकांकडून घरासाठी प्रतिसाद मिळत आहे का ? यावर मंडळाचे मु. अ. यांनी सांगितले की, सदर उर्वरीत ५ गाळे हे दुस-या व तिस-या मजल्यावर असल्यामुळे व रु, ३, ४५, ५००/- एवढी रक्कम एक रक्कमी गाळा ताब्यात देतांना भरावयाची असल्यामुळे गाळयांना प्रतिसाद मिळत नाही.

मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी विचारणा केली की, मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे बन्सीलाल नगर येथील ८४ गाळे उ. उ. गट या वसाहतीमधील मंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांना दिलेले सेवानिवास स्थान बदलुन त्यांना गृहनिर्माण भवनाजवळील १६ उच्च उत्पन्न गट योजनेतील रिक्त गाळयांतील गाळयातुन सेवानिवासस्थान म्हणून द्यावे व बन्सीलालनगर येथील असे रिक्त होणारे गाळे हे सर्वसाधारण जनतेस [या गाळयांस जनतेकडून मागणी प्राप्त होईल या हेतुने] विक्री करण्यांत यावे असे ठरले होते. याबाबत पुढे काय कार्यवाही केली असेही मा. सभापती यांनी विचारणा केली. या अनुषंगाने मंडळाचे मा. मु. अ. यांनी बैठकीत खुलासा केला की, मंडळाच्या दि. ३. ५. ९७ च्या बैठकीत ठराव पारीत केल्याप्रमाणे सदर विक्री या कार्यालयाचे पत्र क्र. २१९३/९७ दिनांक ३१. ५. ९७ अन्वये प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त करुन घेणेबाबतचा प्रस्ताव उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांचेकडे पाठविला आहे. तथापी प्राधिकरणाकडून या विषयाबाबत प्राधिकरणाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. एमएच/आरएसी/से. नि १०९७/६४८७/इएम-१२ दि. ८. ७. ९७ अन्वये कांही मुद्याबाबत खुलासा मागविला आहे व कोणत्या मुद्यावर खुलासा मागविले आहे ते ही मु. अ. यांनी मंडळास वाचुन दाखविले. मु. अ. यांनी असेही सांगितले की, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांनी ज्या मुद्यांबाबत खुलासा मागविलेला होता त्यांचे उत्तर कार्यालयाने पाठविले आहे. परंतु त्यानंतर प्राधिकरणाकडून सदर प्रस्तावास अद्याप पर्यन्त मंजूरी प्राप्त झाली नाही.

वरील प्रमाणे चर्चेच्या ओघात मा. सभापती यांनी बैठकीत सुचीत केले की, मंडळाच्या ठरावास अनुसरुन प्राधिकरणाकडे पाठविण्यांत येणा-या प्रस्तावाची एक प्रत मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनाही पाठविण्यांत यावी. यावर मु. अ. /औ. मं. यांनी सांगितले की, यापुढे अशा प्रस्तावाची एक प्रत मा. अध्यक्ष/प्रा. यांना पाठविण्यांत येईल.

मा. सभापती/औ. मं. व मंडळाचे मा. सदस्य श्री. ठाकुर, श्री. नंदु कुलकर्णी यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने प्राधिकरणाकडे पाठविण्यांत येत असलेल्या प्रस्तावांना प्राधिकरण स्तरावर लवकरात लवकर मंजूरी मिळावी म्हणून व तसेच मंडळाचे प्राधिकरण स्तरावर जे प्रस्ताव प्रलंबीत आहेत त्यास प्राधिकरणाकडून लवकरात लवकर मंजूरी मिळावी. ~~म्हणून~~, तसेच मंडळाच्या अडीअडचणी प्रश्न हे प्राधिकरणास समजावे व ते प्राधिकरण स्तरावर तात्काळ सुटण्यासाठी मदत व्हावी या हेतुने प्राधिकरणाचे काही सदस्यास मंडळाच्या पुढील बैठकीस उपस्थित राहण्यासाठी मंडळातर्फे विनंती करण्यांत यावी, त्यामुळे प्राधिकरणाचे मा. सदस्यांना मंडळाच्या अडचणी/ प्रश्न समजतील व मंडळाच्या प्राधिकरणाकडील प्रलंबीत प्रस्तावांना, तसेच मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने प्रा. कडे पाठविण्यातयेणा-या प्रस्तावांना

प्राधिकरणाकडून लवकरात लवकर मंजूरी मिळावी या दृष्टीने प्राधिकरणाकडे ते प्रयत्न करतील.

चर्चेच्या अनुषंगाने मंडळाच्या मागील बैठकीतील ठराव क्र. ६३२ च्या अनुपालन अहवालाच्या अनुषंगाने मंडळाचे मा. सदस्य श्री. ठाकुर यांनी विचारणा केली की, तालुका स्तरावर गृनिर्माण योजना राबविणेच्या हेतुने जमिनी मिळविण्यासाठी काय प्रयत्न करण्यांत आले, यावर मा. मु. अ. /औ. मं. यांनी खुलासा केला की, जिल्हा/तालुका स्तरावर गृहनिर्माण योजना राबविणेसाठी त्या त्या तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीची पाहाणी करून सविस्तर असा परिपुर्ण मागणी प्रस्ताव संबंधीत जिल्हाधिका-यांकडे मंडळातर्फे पाठविण्यांत आलेला आहे. शासकीय जमिनी मंडळास प्राप्त व्हाव्यात म्हणून मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी, जिल्हाधिकारीयांचेकडे पाठपुरावा करावा म्हणून मु. अ. औ. मं. यांनी मा. सदस्यांना पत्र देऊन विनंती केली आहे. तसेच म्हाडाचे मा. उपाध्यक्ष यांनीही सर्व जिल्हाधिका-यांना पत्र देऊन विनंती केली आहे की, म्हाडास शासकीय जमिनी उपलब्ध करून देणेसाठी सहकार्य करावे. त्यानुसार तहसीलदार औरंगाबाद यांनी म्हाडास मिटमीटा औरंगाबाद येथील २५. ०० हे. सरकारी जमिन देण्याचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविला आहे. मंडळाच्या सदस्य श्रीमती साने, यांनी सांगितले की, परभणी व हिंगोली येथील शासकीय जमिन मंडळास प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेतली असता जिल्हाधिकारी यांनी असे सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयास सरकारी जमिनी मागणीचा प्रस्ताव मुख्याधिकारी यांनी द्यावा त्या अनुषंगाने मु. अ. यांनी सांगितले की, हिंगोली व परभणी येथील शासकीय जमिनी मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी यांना संपूर्ण प्रस्ताव दिलेला आहे व त्याबाबत पाठपुरावाही करण्यांत येत आहे. तसेच मंडळाचे मा. सदस्य श्री. ठाकुर यांनी असे प्रतिपादन केले की, शासकीय जमिनी व्यतिरिक्त खाजगी जमिनी खाजगी जमिन मालकांकडून सम्मतीद्वारे मिळविणेसाठी कांही प्रस्ताव आहेत का ? यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, अंबड, उस्मानाबाद येथील जमिनीची पहाणी केली असता सदर जमिनी हया न. प. हद्दीबाहेर असल्यामुळे तेथे बाहयसुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत त्यामुळे सदर जमिनी गृहनिर्माण योजना हाती घेणेसाठी योग्य नाहीत असा अहवाल संबंधीत उपअभियंता यांनी दिला आहे. भूम येथील जमिनीबाबत श्री. पांडे, उपअभियंता यांनी खुलासा केला की, भूम येथे उपलब्ध जमिन ही एक एकर आहे. पहाणी करण्यांत येत आहे. तसेच इतरत्र संमत्ती असलेल्या जमिनीचीही पहाणी करण्यात येत आहे.

श्री. ठाकुर सदस्य यांनी बैठकीत विचारले की, मंडळाने लोकांकडून मागणी अंदाज अजमाविण्यासाठी जाहिरात दिली होती व त्यानुसार जे अर्ज मंडळाकडे प्राप्त झाले आहेत त्याबाबतपुढे काय कार्यवाही केली व त्यांचेसाठी मंडळ गृहनिर्माण योजना राबविणार आहे का ? व शक्यती लवकरात लवकर गृहनिर्माण योजना राबवावी म्हणजे अशा लोकांच्या त्यांचे मागणी अर्जानुसार घरे देता येतील. तसेच श्री. ठाकुर यांनी प्रतिपादन केले की, प्राधिकरणाचे मा. अध्यक्ष यांनीही त्यांच्या मराठवाड्यातील भेटीच्या वेळी पत्रकार परिषदेत तालुक्याच्या नांवासह माहिती दिली की,

गृहनिर्माण योजना तातडीने राबविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यांत येत आहेत. त्या अनुषंगाने मंडळाने तालुका स्तरावरील गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी प्राधिकरणाकडे पाठपुरावा करावा. यावर मु. अ. यांनी मागणी अंदाज अजमावण्यासाठी प्राप्त अंदाजे ७५००० अर्जांची जिल्हानिहाय माहिती दिली. तसेच सदर अर्जावर पुढील प्रक्रिया करण्यांत येत असल्याबाबत प्रतिपादन केले.

मागील बैठकीतील ठराव क्र. ६३३ च्या इतिवृत्ताबाबत मु. अ. यांनी खुलासा केला की, सदर ठरावाचे पान क्र. १५ वर शेवटच्या ओळीमध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करण्यांत यावी असे प्रतिपादन केले.

---- त्यांचे अतिक्रमण नियमीत करण्याबाबतचा आवश्यक प्रस्ताव प्राधिकरणाकडे मान्यतेस्तव पाठवावा.

यावर सदस्य श्री. ठाकुर यांनी सदर दुरुस्तीस दुजोरा दिला. मुख्य अधिकारी यांनी पुढे प्रतिपादन केले की, अविष्कार कॉलनी औरंगाबाद येथील वसाहतीमधील दुकानासाठी आरक्षीत असलेल्या व्यापारी भूखंड हा मंजूर आराखड्यानुसार आहे. परंतु सदरचा भूखंड मनपास मोकळी जागा म्हणून हस्तांतरीत करावयाचा असल्यास व १४ गाळेधारकांचे अनाधिकृत बांधकाम नियमीत करावयाचे असल्यास त्यासाठी प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल. मोकळ्या जागेलगत ज्या १४ गाळेधारकांनी अतिक्रमण करून बांधकाम केलेले आहे त्या गाळेधारकांकडून सदर भूखंडाची किंमत व अधिमुल्य वसुल करण्यांत यावे व त्यांचे अतिक्रमण नियमीत करण्याबाबत आवश्यक तो प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा. या अनुषंगाने मंडळाचे सदस्य श्री. गणेश माहोरे यांनी प्रतिपादन केले की, प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविला तर प्राधिकरण व्यापारी भूखंडावर दुकाने बांधावे असे म्हणू शकते. यावर मा. सभापती/ औ. मं. यांनी सांगितले की, प्राधिकरणाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर लवकर कार्यवाही होत नाही म्हणून मंडळाच्या ठरावानुसार कार्यवाही करून प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी प्राधिकरणाकडे पाठविण्यांत यावा. त्या अनुषंगाने मंडळ असा निर्णय घेत आहे की,

"अविष्कार वसाहतीमधील दुकानासाठी आरक्षीत असलेल्या भूखंडाचा समावेश त्या लगतच्या जागेत करण्यांत येऊन मनपा औरंगाबाद यांना त्याप्रमाणे खुली जागा हस्तांतरीत करण्यांत यावी. सदर भूखंडाची किंमत व अधिमुल्य मोकळ्या जागे लगत ज्या गाळेधारकांनी अतिक्रमण करून बांधकाम केलेले आहे त्या गाळेधारकांकडून वसुल करण्यांत यावी व त्यांचे अतिक्रमण नियमीत करण्यांत यावे व याबाबत कार्योत्तर मंजूरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत यावा."

मा. सभापती यांनी सुचीत केले की, अनुपालन अहवाल हा बैठकीच्या बाब टिप्पण्यासोबतच यापुढे पाठविण्यांत यावा.

चर्चेच्या ओघात मंडळाचे सदस्य श्री. ठाकुर यांनी विचारले की, गृहनिर्माण भवनाजवळील ४८ मध्यम उत्पन्न गट गाळ्याच्या बांधकाम ठेकेदाराला कार्यमुक्त केले आहे का ? याबाबत खुलासा करण्यांत आला की, सदर विषयाची बाब टिप्पणी मंडळाच्या चर्चेसाठी सादर करण्यांत आलेली आहे व मंडळाच्या ठराव क्र. ६३८ च्या अनुपालन अहवालाच्या अनुषंगाने मु. अ. यांनी असे प्रतिपादन केले की, सदर बाब मंडळाच्या सुचनेनुसार माहितीस्तव सादर करण्यांत आली आहे.

मंडळाच्या १०५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर व अनुपालन अहवालावर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेतला.

ठराव क्र. ६३९

मंडळाच्या दि. २०.८.९७ रोजी झालेल्या १०५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर चर्चा होऊन झालेल्या चर्चेनुसार/निर्णयानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेऊन मंडळाच्या १०५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत दुरुस्तीसह कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: सन १९९७.९८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन ९८.९९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

मा. मु. अ/औ. मं. यांनी सदर बाब टिप्पणीविषयी व अंदाजपत्रकातील जमा व खर्चाच्या बाबीविषयी मंडळास सविस्तर माहिती दिली. सदर अंदाजपत्रकात चालु असलेल्या योजनांची, प्रस्तावीत योजनांची, झो. सु. यो. कार्यक्रमाची व त्यासाठी प्रस्तावीत करण्यांत आलेल्या तरतुदीची माहितीही मंडळासमोर विषद केली. या अनुषंगाने मंडळाचे सदस्य श्री. नंदु कुलकर्णी यांनी प्रतिपादन केले की, या अंदाजपत्रकामध्ये एखाद्या तालुक्याच्या ठिकाणी/जिल्ह्याच्या ठिकाणी शे-दोनशे घरांची योजना राबविण्यासाठी तरतुद करण्यांत आली आहे काय ? अथवा मंडळाने नुकतीच जाहिरात देऊन जी मागणी अंदाज अजमाविला आहे त्यापैकी कांही ठिकाणी घरे बांधण्यासाठी तरतुद अंदाजपत्रकात प्रस्तावीत आहे का ? यावर मु. अ/औं. मं. यांनी सांगितले की, प्राधिकरणाच्या प्रचलीत धोरणानुसार मंडळाच्या मंजूर बांधकाम कार्यक्रमानुसारच सुधारीत अंदाजपत्रक व प्रस्तावीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. तथापी एखाद्या योजनेसाठी तरतुद ठेवावयाची असल्यास त्यासाठीप्रथम जमीन उपलब्ध असणी आवश्यक आहे, त्यावर योजना प्रस्तावीत करुन अंदाजपत्रकात तशी सुधारीत तरतुद करता येऊ शकेल. मंडळाने नुकतीच जी मागणी अंदाज आजमाविलेला आहे ती फक्त भूसंपादन करण्यासाठीच आहे. मंडळाचे सदस्य श्री. नंदु कुलकर्णी यांनी असेही नमुद केले की, या अर्थसंकल्पात मागणी अंदाज लक्षात घेऊन तरतुद ठेवावयास पाहिजे होती. यावर मु. अ. यांनी सांगितले की, बांधकाम कार्यक्रम जेवढा मंजूर आहे तेवढीच तरतुद अर्थसंकल्पात करता येते. जर योजना प्रस्तावीत झाली तर त्यासाठी सुधारीत अर्थसंकल्पामध्ये तरतुद करता येऊ शकेल व तरतुदी अभावी एखादी योजना प्रलंबीत राहणार नाही. मा. सभापती यांनी गेवराई जि. बीड येथे योजना हाती घेण्यासाठी मागणी घेण्यांतआली काय असे विचारले, त्याबाबत मु. अ. औ. मं. यांनी खुलासा केला की, गेवराई येथील योजनेचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येत आहेत व नंतर त्यासाठी ठोस मागणी घेण्यांतआल्यानंतर योजना हाती घेण्याबाबत कारवाई करता येईल.

अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत चर्चा करीत असतांना झो. श्रेणीवाढ योजना याबाबत कांहीच तरतुद ठेवली नसल्याचे मंडळाचे सदस्य श्री. नंदु कुलकर्णी यांनी प्रतिपादन केले. या अनुषंगाने मा. मु. अ/औ. मं. यांनी सांगितले की, झो. श्रेणीवाढ योजनाही फक्त औरंगाबाद व नांदेड या शहरानाच लागुं आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक झोपडीधारकाला त्याच्या

झोपडीचे मजबुतीकरण करण्यासाठी रु. ५००० पर्यन्त कर्ज म्हणून २०वर्षाच्या परतफेडीच्या कालावधीसाठी देण्यात येते. या कामासाठी जि. नि. व विकास मंडळाद्वारे तरतुद करण्यात येते. औरंगाबाद येथील मनपाने राबविलेल्या योजनेबाबतचा अनुभव असा आहे की, संबंधीत झोपडीधारक या कर्जाची परतफेड करीत नाहीत. परंतु मनपास या कर्जाची परतफेड मात्र म्हाडास करावी लागते. त्यामुळे झोपडपट्टीश्रेणीवाढ योजना राबविण्यासाठी संबंधीत मनपा प्रस्ताव पाठवित नाही. तथापी, मनपाकडून जर परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यास झोपडपट्टी श्रेणीवाढ योजना कार्यान्वीत करता येईल.

अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर चर्चा करीत असतांना मा. सभापती यांनी अंदाजपत्रकातील शिर्षकनिहाय तरतुदीबाबत चर्चा केली व त्याबाबतची माहिती अवगत करुन घेतली. तसेच अंदाजपत्रकासोबत दिलेल्या तक्ता क्र. १ मधील जमा लेखा शिर्षका अंतर्गत "ई-०९५ अनामत" या सदराखाली दर्शविलेली रक्कम रु. ५.०० लक्ष आमदार निधीमधुन मंडळास प्राप्तझालेली आहे व सदर रक्कम ही मा. ना. श्री. खोतकर साहेब यांच्या आमदार निधीतुन जालना येथील मंडळाच्या वसाहतीतील सुविधांचे उन्नतीकरण या कामासाठी प्राप्त झाली आहे असा निधी मंडळास प्रथम उपलब्ध करुन दिल्यामुळे मा. ना. श्री. खोतकर साहेब यांचे मंडळातर्फे अभिनंदनपर पत्र त्यांना पाठवावे असे मा. सभापती यांनी सुचीत केले. तसेच मराठवाडयातील ज्या ज्या ठिकाणी मंडळाच्या विविध वसाहती आहेत अशा वसाहतीतील सुविधांसाठी त्या त्या तालुक्याच्या/जिल्हयाच्या मा. आमदारांना, मा. खासदारांना तसेच मा. पालकमंत्री यांना पत्र लिहुन त्यांच्या स्थानिक विकास निधीच्या कामासाठी पुरेसा निधी उपलब्धकरुन देणेसाठी त्यांना मंडळाच्यावतीने पत्राद्वारे विनंती करण्यात यावी असा निर्णय मंडळाने घेतला.

चर्चेच्या ओघात मा. सभापती औ. मं. यांनी सुचना दिल्या की, औरंगाबाद येथील मंडळाच्या एकनाथनगर या वसाहतीतील ड्रेनेज लाईनच्या कामासाठीही मा. ना. श्री. बोरसेसाहेब पालकमंत्री औरंगाबाद जिल्हा यांना पत्र देऊन त्यांचे आमदार निधीतुन यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी विनंती करण्यात यावी. तसेच एकनाथनगर येथील ड्रेनेजच्या उन्नतीकरणासाठी मंडळाकडे उपलब्ध असलेल्या "अकस्मीक खर्च" या लेखा शिर्षकातील तरतुदीमधून खर्च करता येईल का ? याबाबत तपासणी करावी असे मा. सभापतीमहोदयांनी सांगितले. या विषयावर वरीलप्रमाणे चर्चेअंती मंडळाने

ठराव क्र. ६४० निर्णय घेतला की,

1) औरंगाबाद मंडळाचे सन १९९७.९८ चे सुधारीत अंदाजपत्रकास व सन १९९८.९९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळ मान्यता देत आहे.

2) मंडळाच्या जालना येथील वसाहतीतील सुविधांच्या कामासाठी मा. ना. श्री. खोतकर साहेब यांनी त्यांच्या आमदार निधीतुन मंडळास निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे व मा. ना. श्री. खोतकर साहेब यांना अभिनंदनपर पत्र पाठविण्यात यावे तसेच मराठवाडयातील सर्व मा. पालकमंत्री/खासदार/आमदार यांना मंडळाच्या वसाहतीतील सुविधांच्या उन्नतीकरणासाठी त्यांच्या स्थानिक विकास निधीतुन पुरेसा निधी उपलब्ध करुनदेण्यासाठी विनंती करण्यात यावी.

३] एकनाथनगर येथील मंडळाच्या वसाहतीतील सुविधांच्या उन्नतीकरणासाठी आमदार निधीतून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रा. मा. श्री. खैरेसाहेब, पालकमंत्री औरंगाबाद जिल्हा यांना विनंती करण्यात यावी.

विषय क्र. ३: गाळ्यांच्या अंतिम किंमतीच्या धोरणामध्ये बदल करण्याबाबत.

....

मा. मु.अ/औ.मं. यांनी या बाब टिप्पणीविषयी मंडळास सविस्तर माहिती दिली. गाळ्यांच्या किंमती कशाप्रकारे आवाक्यात ठेवता येतील याबाबत मुद्देसुद माहिती बाब टिप्पणीत नमुद केलेली आहे व ती माहिती मंडळास विषद केली. त्या अनुषंगाने मंडळाचे सदस्य श्री. ठाकुर यांनी प्रतिपादन केले की, गाळ्यांच्या किंमतीत वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे मंडळाने प्राधिकरणाकडे पाठविलेल्या गृहनिर्माण योजना मंजूरी देण्यास प्राधिकरणाकडून विलंब लागतो व कधी कधी मंजूरीसाठी पाठविलेल्या योजनांचे अंदाजपत्रके वर्षाची दरसुची बदलल्यामुळे सुधारीत करण्याची वेळ येते. तसेच प्राधिकरणाकडून प्रशासकीय मान्यता लवकर मिळत नाही. त्यामुळे गाळ्यांच्या किंमतीत प्रचंड वाढ होते. म्हणून मंडळाच्या प्रस्तावांना विनाविलंब मंजूरी प्राधिकरणाने द्यावी असा मंडळाने निर्णय घ्यावा. चर्चेच्या ओघात मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे अत्यल्प उत्पन्न गटासाठी व अल्प उत्पन्न गटासाठी नफ्याचे प्रमाण अनुक्रमे २% व ५% आकारण्याबाबत प्रस्तावीत केले आहे. त्याऐवजी हे प्रमाण अनुक्रमे १% व २% असे प्रस्तावीत करावे. तसेच मंडळाच्या गृहनिर्माण योजनांना प्रशासकीय मान्यता त्वरीत देण्यासाठी प्राधिकरणास कळवावे.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६४१
----------

मंडळाच्या बैठकीसमोर गाळ्यांच्या अंतिम किंमतीच्या धोरणामध्ये बदल करण्याबाबत ज्या बाबी बाब टिप्पणीत प्रस्तावीत केलेल्या आहेत त्यास मंडळाने मान्यता दिली व त्यात फक्त खालील प्रमाणे बदल सुचविला.

१] प्राधिकरणाने मंडळाद्वारे प्रस्तावीत गृहनिर्माण योजनांस प्रशासकीय मान्यता शिघ्रगतीने देण्यात येईल अशी व्यवस्था करावी, ज्यामुळे दरसुचीतील बदलामुळे अंदाजपत्रक सुधारीत करावे लागणार नाही व गाळ्यांच्या किंमतीत अनावश्यक वाढ होणार नाही.

२] बाब टिप्पणीत प्रस्तावीत केल्यानुसार अत्यल्प व अल्प उत्पन्न गट गाळ्यांसाठी नफ्याचे प्रमाण हे अनुक्रमे १% व २% असे प्रस्तावीत करण्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ४: मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी
सेक्युरीटी सर्व्हीसेस नेमणुकीबाबत.

या विषयाच्या बाब टिप्पणीबाबत मंडळाचे मु.अ. यांनी मंडळास सविस्तरपणे माहिती दिली व असेही प्रतिपादन केले की, मे मेडोपेटर्स व अजिंठा सेक्युरिटी सर्व्हीसेस या संस्थेकडून रु. ६३००/- दरमहा या दराने ७.११.९६ ते ७.११.९७ या एका वर्षाच्या कालावधीसाठी मंडळाच्या प्रशासकीय इमारतीच्या रक्षणासाठी निविदा प्राप्त झाली होती व ती मंडळाने ठराव क्र. ६१६ अन्वये मंजूर केलेली आहे. तथापी, एक वर्षाच्या कालावधी संपुष्टात आल्यामुळे पुढील ८.११.९७ ते ८.११.९८ या कालावधीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन सुरक्षा व्यवस्था मंडळास पुरविणेबाबत निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार मे. मेडोपर्स व अजिंठा सेक्युरिटीज सर्व्हीसेस यांची एकमेव निविदा रु. ७३५०/- दरमहा या दराने प्राप्तझाली आहे. सदर दर हा जास्तीचा असल्यामुळे हा दर कमी करण्यासाठी दि. १३.१०.९७ रोजी संस्थेच्या प्रतिनिधीस वाटाघाटीस बोलाविले होते. त्याचेशी झालेल्या चर्चेनुसार संबंधीतसंस्थेने दरमहा रु. ६३००/- या पुर्वीच्याच दराने २४ तास सुरक्षा व्यवस्था पुरविणेसाठी संमती दिली आहे असे मु.अ./औ.मं. यांनी मंडळास सांगितले. तसेच गेल्या चार वर्षातील सदर संस्थेची सुरक्षा व्यवस्था चांगली असल्याचेही मत मंडळासमोर व्यक्त केले. यावर मंडळाचे सदस्य श्री ठाकुर यांनी विचारणा केली की, मागील बैठकीत यापुर्वीची निविदा मंजूर करतांना मंडळाने असा निर्णय घेतला होता की, कंत्राटीपध्दतीवर एकत्रीत वेतनावर काम करणाऱ्या कामगारामधून तिन व्यक्तींची चौकीदार म्हणून नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव व रु. ५००/- ऐवजी रु. १०००/- वेतन दरमहा वाढवुन देण्याबाबतचाही प्रस्ताव पाठवावा असे ठरले होते. त्याबाबत काय कारवाई झाली या अनुषंगाने मु.अ/औ.मं. यांनी मंडळास माहिती दिली की, मंडळाच्या निर्णयाप्रमाणे प्रस्ताव सचिव/प्राधिकरण यास पाठविण्यात आलेला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राधिकरणाकडून कांही मुद्याबाबत माहिती मागविलेली आहे व सदर माहिती प्राधिकरणास पाठविण्यात येत आहे. यानंतर मा. मु.अ.औ.मं. यांनी प्रतिपादन केले की, नविन पदे निर्माण करु नये असे प्राधिकरणाचे धोरण आहे. या अनुषंगाने मंडळाचे मा. सभापती व इतर सदस्यांनी सुचीत केले की, मंडळाकडे कंत्राटी पध्दतीवर एकत्रीत वेतनावर काम करणाऱ्या मजुरामधुन चौकीदार म्हणून नियुक्ती करण्याबाबत व रु. ५००/- ऐवजी रु. १०००/- दरमहा वेतन करणेबाबत प्राधिकरणाकडे पाठपुरावा करण्यांत यावा.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६४२
==========

१] मे. मेडोपर्स ॲन्ड अजिंठा सेक्युरिटी प्रा. लि. या संस्थेस ८.११.९७ ते ७.११.९८ या एक वर्षाच्या कालावधीसाठी दरमहा रु. ६३००/- या दराने सुरक्षा व्यवस्था पुरविण्याबाबतच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

२] मंडळाकडे कंत्राटी पध्दतीवर रु. ५००/- दरमहा एकत्रीत वेतनावर काम करित असलेल्या मजूरांना रु. ५००/- ऐवजी रु. १०००/- दरमहा वेतन देण्यासाठी व याच मजुरांमधुन मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या ~~xx~~ सुरक्षेसाठी चौकीदार म्हणून घेणेसाठीच्या प्राधिकरणाकडे पाठविलेल्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा करावा.

विषय क्र.५: झोपडपट्टीसुधारणा कार्यक्रम ९७.९८ अंतर्गत नांदेड येथील झोपडपट्टी सुधारणा कामांच्या वाढीव लोकसंख्येनुसार प्रस्तावास सुधारीत मान्यता प्रदान करणेबाबत.

....

या विषयाबाबतची माहिती मा.मु.अ/औ.मं यांनी सविस्तररित्या मंडळास दिली. वाढीव लोकसंख्येनुसार ९ झोपडपट्टयांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव नांदेड मनपाने औरंगाबाद मंडळास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी करून वाढीव लोकसंख्येनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंडळाच्या मंजूरीस्तव बैठकीत सादर करण्यात आला आहे. नांदेड जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत नांदेड शहरासाठी सन १९९७.९८ या आर्थिक वर्षासाठी रू.२.४३ लक्षची तरतुद असून सन १९९८.९९ या आर्थिक वर्षासाठी रू.६०.०० लक्षाची तरतुद प्रस्तावीत आहे. तसेच नुकतीच नांदेड येथे मनपा स्थापन झाल्याने १९९७.९८ च्या पुनर्विनियोजनात या कामास-साठी रू.६१.८० लक्षाची वाढीव तरतुद मिळण्यासाठी नांदेड मनपाने जि.नि. व वि.मं.कडे प्रस्ताव दाखल केले आहे. व तसे या कार्यालयासही कळविले आहे. तसेच औरंगाबादमंडळाने सुध्दा पुनर्विनियोजनात रू.२५.०० लक्षची तरतुद होण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळ नांदेड यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे.

नांदेड मनपाच्या सद्य:स्थितीत खर्च निरंक असून या वर्षाची तरतुद खर्च होण्याच्या त्रूटीने व पुढील वर्षातील प्रस्तावीत तरतुदीनुसार मनपाच्या हाती कामी असण्याच्या त्रूटीने मनपाने प्रस्तावीत केलेल्या रू.८२,८३,८५१/- च्या कामास प्रशासकीय मान्यता दिल्यास मुळ प्रशासकीय मान्यतेची रक्कम रू.४५,९८,५२४/- वजा जाता रू.३६,९५,३६८/- एवढया रक्कमेची कामे मनपाच्या हाती राहतील असे मु.अ.औ.मं.यांनी मंडळास सांगितले व बाब टिप्पणीत नमुद केलेल्या अ ते फ या अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता देता येईल असे मु.अ.औ.मं. यांनी बैठकीत प्रतिपादन केले. या अनुषंगाने मा.सभापती औ.मं.यांनी सांगितले की, नांदेड महानगरपालिकेने सादर केलेल्या झो.सु.कामांच्या अंदाजपत्रकाप्रमाणे सुविधानिहाय प्रस्तावीत केलेल्या मोजमापानुसार झो.प.सु.कार्यक्रमाच्या मानकाप्रमाणेच व नकाशात दर्शविल्याप्रमाणेच काम करण्यात यावे या अटीच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात यावी.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र.६४३
------------

नांदेड-वाघळा महानगरपालिकेने तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या ९ झोपडपट्टयांच्या रू.८२,९३,८५१/- च्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास वाढीव लोकसंख्येनुसार बाब टिप्पणीत निर्देशीत केलेल्या "अ" ते "फ" या अटीच्या अधिन राहुन मंजूरी देण्यात येत आहे. जेणे करून मनपाच्या हाती मुळ प्रशासकीय मान्यता रू.४५,९८,५२४/- वजा जाता निव्वळ रू.३६,९५,३६८/- ची कामे राहतील.

२) मनपाने वाढीव लोकसंख्येनुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत दाखल केलेल्या प्रस्तावासोबतच्या नकाशाप्रमाणे व सुविधानिहाय प्रस्तावीत केलेला खर्च त्याच सुविधावर खर्च करण्यात यावा व तो इतर सुविधावर

वर्ग करण्यांत येऊ नये.

[३] सदर ठरावाच्या स्थायी करण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

विषय क्र. ६: झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम ९७-९८ अंतर्गत औरंगाबाद येथील झो. सु. कामांना वाढीव लोकसंख्येनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता व नविन घोषित झोपडपट्टयातील योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

• • •

या विषयाच्या बाब टिप्पणीबाबत मु. अ/औ. मं. यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली. तसेच मंडळाने १०५ व्या बैठकीत ठराव क्र. ६३४ अन्वये औरंगाबाद येथील झोपडपट्टयातील वाढीव लोकसंख्येनुसार झो. सु. प्रस्तावास व नविन झोपडपट्टीतील योजनांना प्रशासकीय मान्यताप्रदान करण्यांत आली होती. तथापी मंडळाचे सन्नमाननीय सदस्य श्री. गणेश माहोरे व श्री. अनिल पोलकर यांनी त्यांचे दि. २७. ११. ९७ च्या पत्रानुसार मुख्य अधिकारी/औ. मं. यांना असे कळविले आहे की, मनपाच्या देयकाची अदायगी करतांना मंडळाचे सदस्य या नात्याने झोपडपट्टी सुधार कामांची पाहाणी करीत असतांना अस्तित्वात असलेल्या सुविधा व प्रस्तावीत अंदाजपत्रकीय सुविधा दर्शविणारा नकाशा मनपाने मंडळाकडे अंदाजपत्रकासोबत दिलेला नसल्यामुळे पाहाणी करणे अवघड होते. मंडळाच्या १०५व्या बैठकीपुढे जे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव होते त्यांचे नकाशे मनपाकडून मागवावेत जेणे करून कामाची तपासणी करणे सोईचे होईल व १०५ व्या बैठकीतील मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने जरी प्रशासकीय मान्यतेचा निर्णय झालेला असला तरी त्या बैठकीतील सर्व प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची छाननी करून पुन्हा मंडळापुढे ठेवण्यांत यावे हे पत्र मा. सभापतीयांच्या अवलोकनार्थ व आदेशास्तव सादर केले असता त्यावर मा. सभापती/औ. मं. यांनी असे आदेश दिले की, मनपाकडून नकाशे मागवुन घ्यावेत व सर्व प्रस्तावाची छाननी करून मंडळापुढे ठेवण्यांत यावे व तुर्त प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमीत करु नये असे आदेश दिल्यामुळे सदरचे प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यांत आलेले आहेत असे मंडळाचे मु. अ. यांनी बैठकीत सांगितले. यानंतर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, मनापाकडून प्राप्त झालेल्या नकाशामध्ये सुविधांचे मोजमाप दाखविलेले नव्हते. झोपडपट्टी सुधारणा कामांना मानकाप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. परंतु मंडळाच्या सन्माननीय सदस्यांच्या असे निदर्शनास आले आहे की, प्रस्तावासोबत जोडलेल्या नकाशात दर्शविण्यांत आलेल्या ~~सुविधा~~ या प्रत्यक्षात साईटवर ~~दिसत नाहीत.~~ यावर मनपाचे शहर अभियंता श्री. गायकवाड यांनी खुलासा केला की, मनपाच्या प्रस्तावीत प्रस्तावासोबत जोडलेल्या नकाशामध्ये अस्तित्वात असलेल्या सुविधा व नियोजित सुविधा ह्या दाखविलेल्या आहेत परंतु त्यांचे मोजमाप दाखविण्यांत आलेले नाही याचे कारण त्यांनी असे सांगितले की, ते कामे बऱ्याच वर्षापुर्वी केलेले असल्यामुळे त्यांचे मोजमाप नकाशात दाखविता आले नाही व जेवढया शक्य होईल तेवढया सुविधा नकाशात दर्शविण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने मंडळाचे मा. सभापतीयांनी उदहारणा दाखल विचारले की, नारेगांव झोपडपट्टी सुधार कामाच्या प्रस्तावात देखील अस्तित्वात असणाऱ्या व नियोजीत सुविधा दर्शविण्यांत आल्या नाहीत. या चर्चेच्या ओघात

मा. सभापती औ.मं. यांनी विचारणा केली की, नारेगांव येथील वाढीव लोकसंख्येनुसार प्रस्तावीत केलेल्या ५ सुविधांचा खर्च त्याच सुविधांवर मनपा करणार आहे का ? तसेच शौचालयासाठी असलेली तरतुद त्याच कामासाठी वापरण्यात येईल का ? किंवा ड्रेनेज लाईनच्या कामाला मंडळाला मान्यता देता येईल काय ?. यावर मनपाचे शहर अभियंता श्री. गायकवाड यांनी सांगितले की, नारेगांव येथीलझोपडपट्टीमध्ये लोकांनी वैयक्तीक संडास बांधलेले आहेत. त्यामुळे संडास बांधण्याची गरज नाही तसेच हुडकोकडून कर्ज घेऊन मनपातर्फे तेथे संडास पुरविण्यात आले आहेत. यावर मा. सभापती औं.मं. यांनी विचारणा केली की, शौचालयाच्या कामावरील तरतुद ही ड्रेनेज लाईनवर खर्च करता येईल का ? यावर मंडळाचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, सन १९८६ साली मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी आयुक्त मनपा, मु.अ. नगरपालिका यांच्या बैठकीत सांगितले होते की, झोपडपट्टया मध्ये वैयक्तीक अथवा मनपा/न.पा. ने शौचालये बांधुन दिले असल्यास त्या ठिकाणी शौचालयासाठीची तरतुद ड्रेनेज लाईनवर खर्च करता येईल. त्यानुसार तत्कालीन प्रशासक/प्रा. यांनी मंडळास सुचना दिल्या आहेत. श्री. माहोरे यांनी याबाबत मत व्यक्त केले की, ५ सुविधांवरील तरतुद एकाच सुविधांवर खर्च करता कामा नये. मा. सभापती यांनी अशी विचारणा केली की, नारेगांव येथील प्रस्तावीत अंदाजपत्रकातील सुविधा मानकाप्रमाणे मनपा पुरविणार आहे का व त्यामध्ये कांही बदल होणार नाही का ? तसेच मा. सभापती यांनी सुचविले की, ५ सुविधावरील मंजूर तरतुद एकाच सुविधावर खर्च वा वर्ग करु नये या अनुषंगाने मु.अ औ.मं. यांनी असे प्रतिपादन केले की, मनपाने झोपडपट्टीत अस्तित्वात असलेल्या सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करूनच पुरवावयाच्या सुविधांचे प्रस्ताव सादर केलेले आहेत तेंव्हा एका सुविधांची तरतुद अन्य सुविधांवर वर्ग करण्याचा प्रश्नच उदभवणार नाही. त्यानुसार मंडळास प्रशासकीय मान्यता देता येईल.

यावर मनपा शहर अभियंता श्री. गायकवाड यांनी सांगितले की, सुविधांवरील खर्च झालेल्या रक्कमांची/सुविधांची माहिती मंडळास परत पुरविण्यांत येईल. शेवटी मा. सभापती यांनी बैठकीत सांगितले की, मनपाने नकाशाप्रमाणे व त्यांच्या प्रस्तावामध्ये दाखविल्याप्रमाणेच झोपडपट्टीत सुविधा पुरविल्या पाहिजे व त्यानुसारच काम मनपाने करावे.

चर्चेअंती मंडळाने खालील अटींच्या अधिन राहुन असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ६४४</u>

१] महानगरपालिकेने वाढीव लोकसंख्येनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी व नविन घोषित झोपदट्टीतील योजनांना प्रशासकीय मान्यता--साठी प्रस्ताव मनपाने प्रत्यक्ष पाहणी करून झोपडपट्टीत द्यावयाच्या सुविधानिहाय कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मंडळाकडे पाठविलेला असल्यामुळे आणि सदर सुविधा देणे आवश्यक असल्यामुळे सुविधानिहाय प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. प्रशासकीय मान्यतेनुसारच सुविधानिहाय खर्च करण्यांत यावा व तो इतर सुविधावर वर्ग करण्यांत येऊ नये या व अन्य प्रचलीत अटींच्या अधिन राहुन सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

२] औरंगाबादमनपाच्या तक्ता क्र. १ मध्ये दर्शविलेल्या २४+-३=२७ झोपडपट्टयांच्या रु. १,४२,१०,९३१/च्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास वाढीव लोकसंख्येनुसार बाब टिप्पणीत निर्देशीत केलेल्या "अ" तेफ"

या अटींच्या अधिन राहुन मंजूरी देण्यांत येत आहे,म्हणजे करून मनपाच्या हाती मुळ प्रशासकीय मान्यता रू. ७५, ४२, ३६८/- वजा जाता निव्वळ रू. ६६६८,५६३/- ची कामे राहतील.

३] औरंगाबाद मनपाच्या तक्ता क्र. २ मध्ये दर्शविलेल्या तक्षशिलनगर करिता रू. ७, ४३, ०३९/- व शाहशाक्ता कॉलनीकरिता रू. १, ८९, ५६८/- असा एकुण रू. ९, ३२, ६०७/- च्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास बाब टिप्पणीत निर्देशित केलेल्या 'अ' ते 'फ' या अटींच्या अधिन राहुन मंजूरी देण्यांत येत आहे.

४] सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

विषय क्र. ७: मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

---

विषय क्र. १: शहर भूमापन क्र. २०७२१ वरील ४८ गाळे मध्यम उत्पन्न गट [ब] अन्तर्गत गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदाबाबत.

.....

मा. मु. अ. यांनी उक्त विषयाची बाब टिप्पणी मंडळास वाचुन दाखविली व त्याबाबत सविस्तर माहिती मंडळास दिली.

यानंतर मु. अ. यांनी मंडळास माहिती दिली की, गृहनिर्माण भवनाजवळील ४८म. उ. ग गाळे यांच्या बांधकामासाठी निविदा मागविल्या होत्या; फक्त अेकच निविदा मंडळाकडे प्राप्त झाली होती. सदर निविदा मंडळाच्या बैठकीस मंजूर करण्यांत आली. परंतु ज्या जागेवर ४८गाळ्यांची योजना राबवावयाची आहे. त्याठिकाणी कार्यालयाची जुनी प्रशासकीय इमारत आहे ती पाडल्यानंतरच योजना कार्यान्वीत होऊ शकते. ४८ गाळ्यांची ही योजना जेथे प्रस्तावीत आहे तेथे मंडळाच्या जुन्या इमारती आहेत. त्या पाडण्यासाठी तीन वेळा निविदा मागविल्या होत्या.

त्या अनुषंगाने मा. सभापती औ. मं. यांनी विचारणा केली की, पहिली निविदा कधी दिली.

याबाबत मु. अ. यांनी सांगितले की, पहिली निविदा ३१. १. ९७ ला मागविली होती. सदर निविदा अर्पित किंमतीपेक्षा कमी रक्कमेची आल्याने त्यावर विचार करण्यांत आला नाही.

दुस-या वेळेस दि. ३१. ७. ९७ ला निविदा मागविण्यात आल्या. त्यावेळेस दोन निविदा प्राप्तझाल्या निविदांची छाननी करून पात्र निविदाकारास स्विकृतीपत्र दिले असतां त्यांनी ते काम करण्यास नकार दिला व नियमानुसार त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यांत आली.

तिस-या वेळेस ऑगष्ट९७ मध्ये निविदा मागविण्यांत आल्या. प्राप्त एकमेव निविदा किंमत रू. १, ११, ००० अशी आहे. सदर निविदा ही अर्पीत किंमतीपेक्षा खुप कमी आल्यामुळे व ती मान्य करण्याचे अधिकार प्राधिकरणास असल्यामुळे बाब टिप्पणी तयार करून प्राधिकरणाकडे, प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूरीसाठी ठेवण्याकरिता पाठविली आहे असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

यानंतर मु. अ. औ. मं. यांनी सांगितले की, ४८ गाळ्यांच्या बांधकाम ठेकेदारास कार्यमुक्त करण्याची शिफारस करून सदर प्रस्ताव उपमुख्य अभियंता पुणे मंडळ यांच्याकडे अभिप्रायासाठी पाठविण्यांत आली असता सदर प्रस्ताव उपमुख्य अभियंता/पुणे मंडळ यांनी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांचेकडे दि. १९.८.९७ रोजी सादर केला. या प्रस्तावाची प्राधिकरणस्तरावर विविध शाखेत तपासणी करण्यात आली. व त्यावर त्यांनी आपले अभिप्राय दिले आहेत. मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी विधी सल्लागार प्राधिकरण यांच्या मताशी सहमती दर्शवुन सदर कामाची निविदा २ कोटीच्या आतील असल्याने औरंगाबाद मंडळाच्या अखात्यारीतील असल्यामुळे सदर प्रकरणी निर्णय घेणेसाठी प्रकरण मंडळापुढे ठेवण्यांत यावे व प्राधिकरणाचे अभिप्राय मंडळास अवगत करावे असे कळविले आहे. त्यामुळे ही बाब टिप्पणी मंडळाच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर केले आहे असे मु. अ. यांनी मंडळास सांगितले.

याविषयावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. सुजितसिंह ठाकुर यांनी प्रतिपादन केले की, इमारत ~~पाडण्यासह~~ पाडण्यासह बांधकामाच्या निविदा मागविण्यांत याव्यात. याविषयावर चर्चा करतांना मा. सभापती औ. मं. यांनी सांगितले की, ४८ गाळ्यांच्या बांधकाम ठेकेदारास कार्यमुक्त करून त्याची सुरक्षा ठेव परत करण्यांत यावी. मंडळाने जुनी इमारत पाडण्यासाठीची प्राप्त झालेली निविदेबाबतची बाब टिप्पणी तयार करून प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यासाठी पाठविली आहे ती रद्द समजुन इमारत पाडण्यासह-४८ गाळ्यांच्या बांधकामासाठी पुन्हा निविदा मागविण्यांत याव्यात.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. गणेश माहोरे यांनी प्रतिपादन केले की, पुणे मंडळास अशा प्रकारची परवानगी दिलेली आहे.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६४५

-----------

१] मे. रूद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी ४८ गाळ्यांच्या बांधकामाच्या निविदेबाबत बंधमुक्त करण्यात यावे व त्यांची सुरक्षा ठेव परत करण्यांत यावी.

२] मंडळाची जुनी प्रशासकीय इमारत पाडण्याच्या कामासह बांधकाम निविदा मागविण्यांत याव्यात व मंडळाकडे जुनी इमारत पाडण्यासाठी प्राप्त झालेली निविदा मंजूरकरण्यास्तव प्राधिकरणाकडे पाठविलेली बाब टिप्पणी रद्द समजावी व त्याप्रमाणे प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा.

३] सदर ठरावाच्या स्थायी करण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

पटलावरील विषय संपल्यानंतर मा. सभापती यांच्यामान्यतेनुसार खालील विषयावर चर्चा झाली.

१] प्रा. नंदु कुलकर्णी सदस्य औ. मं. यांनी असा प्रस्ताव मांडला की, म्हाडाच्या नांदेड येथील विविध वसाहतींना थोर नेत्याचे नांव देण्यात येऊन वसाहतीचा गौरवकरण्यात यावा. व खालील प्रमाणे वसाहतींना नावे देण्यांत यावी असे मंडळास सांगितले.

१] नांदेड-सहयोगनगर : दिनदयाळ उपाध्यनगर.
२] लेबरकॉलनीस : राष्ट्रमाता स्व. मिनाताई ठाकरेनगर
३] उच्च उ. गटकॉलनी : शिवचरित्रकार स्व. साईप्रकाश अंबेकर उर्फ साईजीनगर
४. म्हाळजा बोड कामगार वसाहतीस : महाराणा प्रतापनगर

येणेप्रमाणे नामकरण करण्यांत यावे असे प्रा. नंदु कुलकर्णी यांनी सुचविले. याअनुषंगाने मंडळाचे सदस्य श्री. सुजितसिंह ठाकूर यांनी प्रा. नंदु कुलकर्णी यांच्या प्रस्तावास अनुमोदन दिले.

या विषयावर चर्चा करतांना मा. मु. अ. यांनी सांगितले की, मंडळाच्या वसाहतींना मंडळातर्फे नांवे देण्यांत येत नाहीत. तेथील गाळेधारकांच त्यांच्या सोयीनुसार वसाहतींना नावे देतात. नामविस्तार/नामांतर भावनिक प्रश्न असल्यामुळे व आगामी लोकसभा निवडणुका लक्षात घेता असे करणे योग्य होणार नाही असे मु. अ. यांनी प्रतिपादन केले. तसेच नांव बदलण्यासाठी अनावश्यक खर्च होईल. त्यामुळे वसाहतीचे नांव बदलने शक्य होणार नाही असे प्रतिपादन केले.

या विषयावर चर्चा करतांना प्रा. नंदु कुलकर्णी यांनी सांगितले की, सध्या ठराव मंजूर करुन घ्यावा व नंतर अंमलबजावणी करण्यांत यावी यास मा. सभापतीमहोदयांनीतत्वत: मान्यता दिली व चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६४६

१] नांदेड येथील मंडळाच्या खालील वसाहतींना प्रा. नंदु कुलकर्णी यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे नामकरण करण्यास मंडळास मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १] सहयोगनगर | : | दिनदयाळ उपाध्यायनगर |
| २] लेबर कॉलनी | : | राष्ट्रमाता स्व. मिनाताई ठाकरेनगर |
| ३] एचआयजी कॉलनी | : | स्व. साईप्रकाश अंबेकर उर्फ साईजीनगर |
| ४] म्हाळजा बिडी कामगार वसाहत | : | "महाराणा प्रतापनगर" |

...

[२] प्रा. नंदु कुलकर्णी यांनी असे नमुद केले की, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जीनगर येथील बांधकाम चालु असलेल्या ६० गाळ्या व्यतिरिक्त आणखी १६ गाळ्यांचे बांधकाम निविदा दराप्रमाणे करण्यासाठी मान्यता देण्यांत यावी.

यावर मु. अ. यांनी खुलासा करण्यांत आला की, याबाबतीत प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल.

या अनुषंगाने मा. सभापतीओ. मं. यांनी सांगितले की, गाळ्यांस मागणी असल्यास प्राधिकरणाकडून मान्यता घेऊन त्याचठेकेदाराकडून ज्या दराने तो ६० गाळ्यांचे काम करीत आहे त्याच दराने हे काम करुन घ्यावे.

या अनुषंगाने चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की,

ठराव क्र. ६४७

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जीनगर नांदेड येथे ६० अल्प उत्पन्न गटाच्या व्यतिरिक्त आणखी १६ गाळे सध्याच्या कॉन्ट्रॅक्टदाराकडून तो ज्या दराने ६० गाळ्यांचे काम करीत आहे त्याच दराने बांधण्याबाबत प्राधिकरणाकडे प्रस्ताव मान्यतेस्तव पाठविण्यांत यावा.

[३] मंडळाच्या सदस्या श्रीमती कमल तुल्ले यांनी सांगितले की, जालना येथील श्रीकृष्णनगर येथील लोकांना पाण्याची अत्यंत टंचाई आहे. तेथे काही तरी व्यवस्था करणे आवश्यक आहे. यावर मंडळाचे उपअभियंता श्री. पांडे यांनी सांगितले की, शिवाजीनगर येथून श्री. कृष्णनगर या वसाहतीस पाणीपुरवठा करण्यांत येतो. परंतु तो ही फारच कमी आहे. श्री. कृष्णनगरमध्ये बोअर सुद्दा घेतलेली आहे परंतु त्यास पाणी नाही.

या अनुषंगाने मंडळाच्या सदस्यांनी सांगितले की, नगरपालिकेमार्फत टँकर्द्वारे पाणीपुरवठा करण्यांत यावा, यावर मंडळाच्या सदस्यांनी सांगितले की, न.प.कडे फक्त तीनच टँकर आहेत व टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे शक्य नाही. यासाठी असेही सुचविले की, सदर वसाहतीतील पाणीपुरवठ्यासाठी जि. नि. व विकास मंडळामधून अथवा/खासदार/आमदार निधीतुन आवश्यक रक्कम मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यांत यावा.

मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, म्हाडाने बांधलेल्या वसाहतीना बाह्य सुविधापुरविण्याची जबाबदारी न.प.ची आहे. म्हाडाने पाणीपुरवठा करावयाचा झाल्यास तेथील गाळेधारकांनी सेवाआकार देणे आवश्यक आहे. तेथील गाळेधारक मंडळाचे मासिक हप्तेही वेळेवर भरत नाही. त्यामुळे त्यांच्याकडून आणखी वेगळा सेवा आकार वसुल करणे शक्य नाही. त्यामुळे वर प्रस्तावीत केल्याप्रमाणे खासदार /आमदार फंडातुन यासाठी निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यांत यावा.

श्रीमती तुल्ले यांनी सांगितले की, जालना येथील ९ भूखंडाची [उ.उ.ग] जाहिरात काढण्यांत यावी.

या अनुषंगाने खुलासा करण्यांत आला की, या भूखंडाशेजारी असलेल्या मंदिराचा पुजारी हा जमिनीचे मोजमापास व इतर कामास नेहमी अडथळा करतो. त्याविरुध्द न्यायालयात केसस दाखल केलेल्या आहेत. न्यायालयाने मंडळाच्या बाजुने निकाल दिला असुन मंडळाच्या कामास अडथळा करु नये असा मनाई हुकूम दिलेला आहे. परंतु सदर पुजारी हा नेहमी मंडळाच्या कामात अडथळा आणतो. त्याच्याविरुध्द पोलीस केसेस नोंदविलेल्या आहेत. पोलीस त्यास पकडुन घेऊन जातात व नंतर सोडून देतात. न्यायालयाने मंडळाच्या कामात अडथळा आणू नये असे आदेश दिलेले आहेत. तरीही सदर पुजारी मंडळाच्या कामात अडथळा आणतो म्हणून न्यायालयाचा अवमान केला म्हणून न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात येईल. सदर पुजारी हा नागरी हक्क संरक्षण कायद्याखाली [अँट्रोसीटी] गुन्हा दाखल करण्याची धमकी देतो असे मु. अ. यांनी सांगितले.

यावर मा. सभापतीमहोदयांनी सांगितले की, पोलीस संरक्षणासाठी आवश्यक तो आकार भरुन पोलीससंरक्षण घ्यावे व मोजणी करुन घ्यावी.

(सही)

ठराव क्र. ६४८
----------

यावर मंडळाने असा निर्णय घेतला की, (१) जालना येथील ९ उच्च उत्पन्न गट भूखंडाचे मोजमाप करण्यासाठी मंदीराच्या पुजाऱ्याला प्रतिबंद करण्यासाठी मंडळातर्फे पोलीस खात्याकडे आवश्यक तो आकार भरुन पोलीस संरक्षण घेण्यांत यावे व तसे पोलीस अधिक्षक, जालना यांना विनंती करण्यांत यावी.
(२) ~~तसेच~~ श्रीकृष्णनगर कॉलनीस पाणीपुरवठा करण्यास्तव न.पा. जालनास विनंती करण्यांत यावी असे ठरले.

(सही)

मा. सभापती यांनी बैठकीचा समारोप करतांना असे प्रतिपादन केले की, मुकूंदवाडी व तिसगांव येथील गृहनिर्माण योजना या प्रत्येक वर्षाच्या अर्थसंकल्पात समाविष्ठ करण्यांत येतात व सुधारीत अर्थसंकल्पकरतांना त्या वगळण्यांत येतात. यावर मु. अ. यांनी सांगितले की, मुकूंदवाडी येथील गृहनिर्माण योजनाबाबत सिडकोने जमिनीचा भाडेपट्टा करारनामा करुन देण्यात येईल असे त्यांचे पत्र दि. २९. १२. ९७ अन्वये कळविले आहे त्यामुळे सदर प्रश्न लवकर निकाली निघेल असे वाटते. मा. सभापती महोदयांनी उल्लेख केल्याप्रमाणे मुकूंदवाडी येथील योजनेच्याबाबतीत अडचण होणार नाही व सन १९९८ या वर्षात योजना कार्यान्वीत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

शेवटी मु. अ. यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व राष्ट्रगीतानंतर मा. सभापतींच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

31-12-97

सभापती,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद.